दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

बोला पुडलिका वर देव हरी विठ्ठल,श्री ज्ञानदेव तुकाराम

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | रविवार ०६ जुले २०२५ | अंक १९८ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# जे बाळासाहेबांना जमलं नाही ते देवेंद्र फडणवीसांना जमलं, राज ठाकरेंचा जबरदस्त टोला



महाराष्ट्र सरकारने त्रिभाषा सूत्रातील हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय मागे घेतल्यानंतर आज (शुक्रवार, ५ जुलै २०२५) ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा एकत्र विजयी मेळावा होत आहे. मुंबईतील वरळी येथील डोम सभागृहात या विजयी मेळाव्याचे आयोजन केले. या मेळाव्यात राज ठाकरे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जोरदार टोला लगावला. या मेळाव्याला राज ठाकरेंनी संबोधित केले. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना एकत्र आणण्यासाठीच्या प्रयत्नांबद्दल त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र यांनी भाष्य केले. राज ठाकरेंनी फडणवीस

## महाराष्ट्राकडे वेड्यावाकड्या नजरेने कुणी पाहायचं नाही

आता सर्वच चॅनेलचे कॅमेरे इकडे लागले तिकडे लागले. आता संध्याकाळी सगळं सुरु होईल. काय वाटतं काय, दोघांची बॉडी लँग्वेज कशी होती. कोणी कमी हसलं का. बोलतायत का. आपल्याकडे इतर विषय सोडून इतर गोष्टीत रस असतो अनेकांना. आजचा हा मेळावा. मोर्चालाही तीच घोषणा होती. आताही तिच आहे. कोणताही झेंडा नाही. मराठी हाच अजेंडा. माझ्या मराठीकडे, महाराष्ट्राकडे वेड्यावाकड्या नजरेने कुणी पाहायचं नाही, असा इशारा राज ठाकरेंनी दिला.

जबरदस्त टोला लगावला. "आजचा मेळावा खरं तर शिवतीर्थावर (शिवाजी पार्क) व्हायला हवा होता. मैदान ओसंडून वाहिलं असतं. पण सध्या पाऊस असल्यामुळे मुंबईतअशा मोठ्या मेळाव्यासाठी जागा मिळत नाहीये. बाहेर जे उभे आहेत, त्यांची मी दिलगिरी व्यक्त करतो. आता (मेळावा) स्क्रीनवर आटपा, असे राज ठाकरे म्हणाले.आम्हा दोघांना एकत्र आणण्याचं ते देवेंद्र फडणवीस यांना जमलं "मी माझ्या मुलाखतीत म्हटलं होतं, त्यातूनच या गोष्टी सुरू झाल्या. कोणत्याही वादापेक्षा आणि कोणत्याही भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे, असं मी म्हटलं होतं. तब्बल २० वर्षांनंतर उद्धव आणि मी एका मंचावर येत आहोत. जे बाळासाहेबांनाही जमलं नाही, जे अनेकांना जमलं नाही, आम्हा दोघांना एकत्र आणण्याचं ते देवेंद्र फडणवीस यांना जमलं." असे राज ठाकरे म्हणाले.

# मराठवाडा अभ्यासिकेचे उद्घघाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते संपन्न,

### विद्यार्थ्यांनो अभ्यास करा स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपण यशस्वी व्हाल,जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी

बीड शहरातील नगद नारायण प्लाझा अंबिका चौक पांगरी रोड बीड या ठिकाणी मराठवाडा अभ्यासिकेचा उद्घाटन सोहळा या अभ्यासिकेचे संचालक तथा आदर्श व्यक्तिमत्व केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर तळेकर यांच्या मराठवाडा अभ्यासिकेच्या उद्घघाटन शुभारंभ जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सर यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी उपस्थित मान्यवर होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सर यांनी स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, यावेळी जिल्हाधिकारी आपल्या भाषणात म्हणाले आहेत की विद्यार्थ्यांमध्ये जिद्द चिकाटी मेहनत घेऊन आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करा व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती सांगितली




यावेळी स्पर्धा परीक्षा करणारे विद्यार्थी पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परमेश्वर तळेकर यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार युवा पत्रकार अंकुश गवळी यांनी केले, यावेळी विद्यार्थी तरुण पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते,

# आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून मिळणार निराधारांना आधार

बीड ग्रामीण व शहरी भागातील ३७८ निराधार, दुर्बल लोकांचे संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत प्रस्ताव मंजूर झाले असून आ.संदीप क्षीरसागर यांच्या पुढाकारातून आणि प्रयत्नातून निराधारांना आधार मिळणार आहे. पात्र वयोवृद्ध निराधार, अपंग, विधवा, परित्क्तत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेल्या समाजातील दुर्बल घटकांना शासनाकडून संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य केले जाते. बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील नागरिकांच्या, या योजनांच्या प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करून निकषपात्र नागरिकांना लाभ देण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले होते. त्यावर प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर कार्यवाही करत २९ मे २०२५ च्या बैठकीत संजय गांधी निराधार योजनेंतर्गत शहरी भागातील ४५ तर ग्रामीण भागातील ६२ नागरिकांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच श्रावणबाळ सेवा निवृत्ती वेतन योजनेंतर्गत शहरी भागातील ४६ तर ग्रामीण भागातील २२५ नागरिकांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. दरम्यान काही अर्ज त्रुटीत असून त्याच्या पुर्ततेसाठी तहसील कार्यालयात संपर्क करण्याचे आवाहनही आ.क्षीरसागर यांनी केले आहे.




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

रविवार ०६ जुले २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## अर्थसंकल्पाला पुरवणी मागण्यांचे ठिगळे

राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प कार्यान्वित होऊन तीन महिने पूर्ण होईपर्यंतच त्याला पुरवणी मागण्यांची ठिगळे जोडण्यास सुरुवात झाली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारने तब्बल ५७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. वाढत्या पुरवणी मागण्यांमुळे ङ्गनियोजनफ नामक संकल्पनेलाच धक्के बसत आहेत आणि अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी कागदावरच राहू लागल्या आहेत. राज्याचा यंदाचा अर्थसंकल्प कार्यान्वित होऊन तीन महिने पूर्ण होईपर्यंतच त्याला पुरवणी मागण्यांची ठिगळे जोडण्यास सुरुवात झाली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारने तब्बल ५७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. अर्थतज्ज्ञ आणि विरोधक टीका करीत असले, तरी महायुती सरकारकडे असलेल्या भक्कम बहुमतामुळे या मागण्या मंजूर होतील; पण दिवसेंदिवस वाढत्या पुरवणी मागण्यांमुळे ङ्गनियोजनफ नामक संकल्पनेलाच धक्के बसत आहेत आणि अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या तरतुदी कागदावरच राहू लागल्या आहेत. अनिवार्य बाबींसाठी किंवा आपत्कालीन परिस्थितीत पुरवणी मागण्या मांडण्यास हरकत असण्याचे कारण नाही. मात्र, त्याचा आता पायंडाच पडू लागला आहे. यंदाच्या पुरवणी मागण्यांमधील मोठा हिस्सा हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून सादर झाल्याचे ढळढळीत दिसते आहे. ही राजकीय अपरिहार्यतेपोटी आर्थिक शिस्तीशी केलेली तडजोडच म्हणावी लागेल. पुरवणी मागण्यांमध्ये १९ हजार कोटी रुपयांच्या अनिवार्य खर्चाचा समावेश आहे, तर ३४ हजार कोटी रुपये कार्यक्रमाअंतर्गत आणि तीन हजार कोटी रुपये केंद्र सरकारच्या योजनांमधील हिश्शापोटी आहेत. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांना मुद्रांकशुल्काचा परतावा, मुंबई मेट्रो आणि भुयारी मार्गांच्या प्रकल्पासाठी राज्य सरकारचा हिस्सा, साखर कारखान्यांना फरकापोटी कर्ज, अपूर्ण सिंचन प्रकल्प, जिल्हा मार्ग आणि पूल; तसेच श्रावणबाळ निवृत्तीवेतन आणि संजय गांधी निराधार योजना, एसटी सवलतींच्या खर्चाची प्रतिपूर्ती आणि पायाभूत सुविधा विकास आदी कामांसाठी या मागण्या आल्या आहेत. सरकारचे पैसे कोठे खर्च करावे, याचे प्राधान्यक्रम ठरवण्याचा आणि बदलण्याचाही सरकारला अधिकार आहे; पण प्रश्न असा की, तीन महिन्यांपूर्वी अर्थसंकल्प मांडताना या खर्चाचा विचार का झाला नाही? मुद्रांकशुल्काचा परतावा किंवा एसटीच्या सवलतींपोटीची रक्कम या बंधनकारक बाबी अर्थसंकल्प मांडताना विचारात न घेण्यामागील कारणे काय, याचे कोडे उलगडत नाही. नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद आवश्यकच आहे; पण कुंभमेळा हा अचानक येणारा योग नव्हे. त्यामुळे त्याच्याशी संबंधित आवश्यक खर्चाचे नियोजन राज्य सरकारच्या संबंधित विभागाने वेळीच केल्याचे दिसत नाही. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अचानक उद्भवणारे खर्च किंवा आपत्कालीन परिस्थितीत निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुरवणी मागण्यांची संकल्पना पुढे आली. मात्र त्यांचा अतिरेक होऊ लागल्याने मूळ अर्थसंकल्प दिवसेंदिवस अर्थहीन ठरू लागेल काय, अशी भीती वाटू लागली आहे. गेल्या काही काळात सर्वच विभागांना ही लागण होऊ लागली आहे. २०२१-२२च्या चार लाख ९४ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पानंतर एक लाख १७ हजार कोटी रुपयांच्या; तर २३-२४ मध्ये साडेपाच लाख कोटींच्या अर्थसंकल्पात ७६ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या आल्या. गेल्या वर्षी तर सहा लाख १२ हजार कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पात पावसाळी, हिवाळी आणि पुढील अर्थसंकल्पीय अधिवेशनात, अशा तीन वेळा मिळून एक लाख ३७ हजार कोटी रुपयांच्या, म्हणजे अर्थसंकल्पाच्या २३ टक्के रकमेच्या पुरवणी मागण्यांचा विक्रम झाला. यापैकी पूरस्थिती किंवा आपत्कालीन स्थिती निवारणाचे खर्च समजण्याजोगे आहेत; पण अन्य पायाभूत प्रकल्प किंवा थेट मदतीच्या योजनांचे अर्थसंकल्पाला अस्तर लावण्याची वेळ का यावी?

# बीडचे नवे लोकनेते-बजरंग सोनवणे

सारणी (ता.केज) सारख्या छोट्या गावात आणि सामान्य शेतकरी कुटूंबात जन्मलेले बजरंग सोनवणे यांनी महाविद्यालयीन जीनवात सामाजिक कार्याला सुरूवात केली. यातून त्यांनी गावपातळीवर लोकसेवेचा वसा घेतला आणि पहिल्याच निवडणूकीत त्यांनी ग्रामपंचायतमध्ये एंन्ट्री केली यानंतर उपसरपंचपदापासून सुरू झालेला प्रवास जिल्हा परिषद सदस्य, सभापती आणि पुढे लोकसभा सदस्यांपर्यंत येऊन ठेपला. हे करताना त्यांनी कायम सामान्य लोकांना सोबत घेवून काम केले आहे. कधीही कोणाबद्दल द्वेषभावना न ठेवता, सर्वांना सोबत घेवून एक-एक पाऊल पुढे टाकत राहिले. या काळात त्यांची औकात, प्रारब्धाच्या गोष्टीही विरोधकांनी केल्या. पण त्याकडे दुर्लक्ष करून ते सामान्य माणसांच्या न्याय हक्कासाठी आणि जिल्ह्याच्या विकासासाठी लढत राहिले. परिणामी, आज ते बीड जिल्ह्याचे नवे लोकनेते ठरले आहेत. खा.बजरंग बप्पा सोनवणे हे कामय लोकात राहणारे आणि मिळालेल्या प्रत्येक पदाचे सोने करणारे व्यक्तीमत्व आहे. जिल्हा परिषदेत सभापतीपद मिळाल्यानंतर त्यांनी जिल्हा पिंजून काढला. जाईल तीथे लोक आपलेसे केले. हे करत असताना राजकिय मंडळींना आपण कसली जुळवा जुळव करत आहोत, हे मात्र कळू दिले नाही. तालुका आणि गावागावात आपली हक्काचे माणसे तयार केली. त्याच वेळी त्यांनी लोकसभा निवडणूकीची आखणी डोक्यात सुरू केली होती. सन २०१९ मध्ये लोकसभा निवडणूकीमध्ये बजरंग (बप्पा) सोनवणे यांना पराभवाचे तोंड पहावे लागले. यानंतर झालेल्या पराभवाने ते खचले नाहीत. उलट आपल्याला पहिल्या प्रयत्नात मोठे यश आले असून पुढील निवडणूकीत आपण जिंकूच, असा आत्मविश्वास ते कायम दाखवत. सन २०२४ मध्ये पुन्हा लोकसभा निवडणूक लागली. निवडणूकीला सुरूवात झाली आणि स्वत:ला बलाढ्य आणि आपण हरूच शकत नाहीत, असा गैरसमज घेवून काम करणारे विरोधक बप्पांच्या प्रारब्ध, औकातीपर्यंत येऊन ठेपले. इकडे बप्पा, त्याही गोष्टीकडे दुर्लक्ष करताना अनेकदा त्यांना ते का उत्तर देत नाहीत, हे समजायचे नाही. दरम्यान, अशा गोष्टीत वेळ घालविण्यापेक्षा आपल्याला एक एक माणूस जोडणे महत्वाचा आहे, ते आपण करू, असे बप्पा म्हणत. यातूनच लोकसभा निवडणूकीत मोठा विजय झाला. विजय झाला कसलाही उन्माद न करता हारतुरे बाजूला सारून या जिल्ह्याचा आपल्याला विकास करायचा आहे, असे म्हणत अवघ्या चार दिवसानेच बीडच्या रेल्वेची पहिली बैठक लावली. या बैठकीतून त्यांनी बीडकरांच्या एका मोठ्या स्वप्नाला हात घातला. पुढ ते पुर्ण करण्यासाठी ते लागेल तो पाठपुरावा करत आहेत. याच प्रयत्नातून रेल्वे कामाला गती मिळाली आहे. रेल्वेचे स्वप्न लवकरच पुर्ण होणार आहे. दरम्यान, सोलापूर-धाराशिव रेल्वे मार्गाची नवीन मागणी केली. यात आवश्यक पाठपुरावा करून सर्वेक्षणासाठी निधी मंजूर करून घेतला. बीडला विमानतळ व्हावे, अशी पहिली मागणीही खा.सोनवणेंनीच संसदेत केली. जेव्हा मागणी केली तेव्हा विरोधक त्यांच्यावर हसत होते. परंतु ती मागणी देखील पुर्ण होत असून आता विमानतळासाठी सर्वेक्षण सुरु झाले आहे.रुग्ण सेवेसाठी प्रधानमंत्री केअर फंडातून तसेच विविध योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपये मंजूर केले आहेत. राष्ट्रीय महामार्गासाठी ४२१ कोटी मंजूर करून घेतलेच पण वारंवार बैठका घेवून रखडलेल्या महामार्गाच्या कामांनाही गती दिली. लोकांचे कामे करण्यासाठी सकाळी ८ वाजता त्यांचा जनता दरबार सुरु होतो. मतदारसंघातील सुख: दुखात अवघे सोनवणे कुटूंब हजर आहे. लोकांना सहज उपलब्ध होणारे खासदार म्हणून बजरंग सोनवणेंकडे पाहिले जाते. कारखाने उत्तम रितीने चालवले त्याचप्रमाणे ते जिल्हा चालवत आहेत. कारखान्याचा



आढावा घेताना ते सलग ८-८ तास उभे राहून कामे करुन घेतात. संसद अधिवेशात सक्रिय सहभाग घेतात. सकाळी बीड मतदारसंघात, दुपारी दिल्लीत, दूसऱ्या दिवशी मुंबई येथे अधिकाऱ्यांच्या दालनात बैठक घेतात. पायाला भिंगरी लावून फिरत ते काम करत आहेत. बीड जिल्हा अनेक वर्षे अशाच नेतृत्वाच्या शोधात होता, तो खासदार बजरंग सोनवणे यांच्या रुपाने नवा लोकनेता मिळाला. बप्पांचा स्वभाव इतका सामान्य आहे. मला दिल्लीतील एक प्रसंग आठवतो. खासदार झाल्यानंतर प्रथमच आम्ही दिल्लीला गेलो. पुणे विमानतळावर पोहचण्यास उशिर झाला. आत मधे जाण्यासाठी महिला कर्मचारीने आम्हाला रोखल. पण अचानक तेथील पोलिस व राजशिष्टाचार विभागाचे अधिकारी आले. त्यांनी आम्हाला सनमान देत विमानात बसवले. दिल्लीत पोहचलो. सर्व जण बप्पांकडे कुतूहलाने पाहत होते. फोटो काढण्यासाठी दिल्ली विमानतळावर गर्दी जमली. संसदभवन आवारात गेल्यावर उत्तर प्रदेशच्या एका मोठ्या नेत्याने तर बप्पाला चक्क उचलून घेतले.सर्व कामे आटोपल्यानंतर महाराष्ट्र निवासस्थानी आम्ही विश्रांतीसाठी पोहचलोत. तिथे बसल्यानंतर बप्पांच्या डोळ्यासमोर कदाचित त्यांचा प्रवास आठवला असावा. बप्पा म्हणाले, मी जनतेच्या कामांसाठी कित्येक वेळ आमदार, मंत्र्यांच्या दालनाबाहेर वेटींग करत असायचो. ग्रामपंचायत ते संसद भवन असा त्यांचा जीवनप्रवास एका क्षणात त्यांच्या डोळ्यासमोर आला असावा. मनस्वी आनंदी दिसत होते. हा खेळाडू आजवर गल्ली क्रिकेट खेळत होता पण आता मोठे मैदानावर खेळायची संधी मिळाली आहे. या खेळाडूवर प्रेम करत राहू, विश्वास ठेवा, बीड जिल्ह्यात विकासाच्या अनेक ट्राफी जिंकून आणेल. भविष्यात विश्वचषक रुपी मंत्रीपद जिल्ह्याला मिळेल हीच आई येडेश्वरी, तुळजाभवानी चरणी प्रार्थना!, वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा, खासदार महोदय!

**-सुरज लक्ष्मण खोडसे**
**9765259393**

# वाढदिवस साजरा न करण्याचा खा.सोनवणेंचा निर्णय

## बालकांची आरोग्य तपासणी करून घेण्याचे खा.सोनवणेंचे आवाहन

बीड: मस्साजोगचे सरपंच कै.संतोष अण्णा देशमुख यांचे दुर्दैवी दु:खद निधन, बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्याही मोठ्या प्रमाणात झाल्या आहेत तसेच अपघाताम धे युवकांचे निधनही झाले आहेत. या पार्श्वभूमीवर, आज वाढदिवस साजरा करणार नसल्याचा निर्णय खा.बजरंग सोनवणे यांनी जाहिर केला आहे. दरवर्षी वाढदिवस म ोठ्या उत्साहात साजरा केला जात असतो. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमूख यांची निर्घृण हत्या झालेली आहे, यामुळे संपूर्ण जिल्ह्यात दु:ख व्यक्त केले जात आहे. या घटनेचे माझ्याही मनात मोठे दु:ख आहे. यामुळे वाढदिवस साजरा करणे मनाला पटत नाही. त्यामुळे या वाढदिवसी, हारतूरे, पुष्पगुच्छ टाळून रक्तदान, कृत्रिम अवयवदान शिबिरे व इतर सामाजिक उपक्रमांसोबत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात



० ते १८ वयोगटातील बालकांची आरोग्य तपासणी होणार आहे. या सर्वच समाजोपयोगी उपक्रमांमधे अधिकाधिक सहभागाची नोंद होईल यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करूया. आपल्या शुभेच्छा सोशल मिडियातून मि ळाल्या तरी मला आनंद वाटेल, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी जाहिर केले आहे.

# माजलगावच्या दबडगावकर कालनीत सय्यद मैनुदीनचा खुन

## रोड्वर बसल्यामुळे वाहन चालकाने जोरात ढकलुन दिल्याने सय्यद मैनुदीन जागीच ठार

माजलगाव तालुक्यातील मनुरवाडी येथील रहिवासी असलेले सय्यद मैनुदीन वय ५० वर्षीय इसम रस्त्याच्या कडेला बसलेला असताना एका वाहनातील चालकाने त्यास जोरदार ढकलले असता डोक्याला मार लागल्यामुळे हा इसम जागी ठार झाल्याची घटना काल दि. ४जुलै शुक्रवारी रोजी साडेचार वाजण्याच्या सुमारास दबडगावकर कॉलनी या ठिकाणी घडली आहे माजलगाव शहर पोलीस ठाण्या लगत व मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेल्या दबडगावकर कॉलनी या ठिकाणी मनुरवाडी येथील इसम सय्यद मैनुदीन वय ५० या मनुरवाडी हे रस्त्याच्या बाजूला बसलेला असताना या ठिकाणाहून वाहन जात नसल्यामुळे एका चार चाकी वाहन चालकाने आपले वाहन काढता येत नसल्यामुळे त्यांनी सय्यद मैनुदीन यांना बाजुला करण्याच्या नादास त्यास जोराचा धक्का दिल्याने सय्यद मैनुदीन खाली पडले यात मैनुदीन खाली पडल्याने त्याच्या डोक्याला जोराचा मार लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाल्याचे




घटनास्थळीवरील नागरिकांनी सांगितले या सर्व घटनेचा एका बँकेच्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये सर्व घडलेली घटना असल्याचे सांगितले जात असून पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतला असल्याचे सांगितले जाते याबाबत पोलिसांना तो वाहन चालक कोण याबाबत विचारणा केली असता तपास चालू आहे असे सांगण्यात आले घटनास्थळ चा पोलिसांनी पंचनामा केला असून रात्री उशिरापर्यंत शवविच्छेदन झालेले नव्हते यामुळे रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता..

# भगर खाण्यापूर्वी काळजी घ्या

# जिल्हा प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

बीड, दिनांक ०५ श्रावण मास, एकादशी, महाशिवरात्री, नवरात्र, आषाढी एकादशी आदी उपवासाच्या काळात ङ्गभगरफ्चे (सामा, वरई) सेवन मोठ्या प्रमाणावर होते. भगर पचायला हलकी, उपयुक्त आहे. परंतु अलीकडील काळात काही ठिकाणी भगर खाल्ल्यानंतर विषबाधेचे प्रकार घडलेत. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी भगरचे सेवन करताना योग्य काळजी व खबरदारी घेण्याचे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे. परवाना प्राप्त व विश्वासार्ह विक्रेत्यांकडूनच भगर खरेदी करावी. ती स्वच्छ, कोरडी, गंधविरहित आणि बुरशीमुक्त असावी. खराब, काळसर किंवा बुरशी लागलेली विकत घेऊ नये. बाजारात कमी दरात मिळणाऱ्या पॉलिश केलेल्या, प्लास्टिकसदृश चमकदार भगरपासून दूर राहावे. एफएसएसएआय (ऋडडअख) प्रमाणपत्र असलेलीच भगर खरेदी करण्यास प्राधान्य द्यावे. भगर शिजवण्यापूर्वी किमान २-३ वेळा स्वच्छ पाण्यात धुवावी. शक्य असल्यास ३० मिनिटांपर्यंत पाण्यात भिजवावी.



स्वयंपाक करताना स्वच्छ, उकळलेले पाणी, भांडी वापरावी. योग्य तापमानावर भगर पूर्णपणे शिजेपर्यंत उकळावी. शिजवलेली भगर साठवताना, खाण्यापूर्वी खूप वेळ उघड्यावर किंवा खोलीच्या तापमानावर ठेवू नये. अन्न साठवताना ते झाकून ठेवावे, फ्रिजमध्ये ठेवणे अधिक सुरक्षित राहील. उरलेली भगर पुन्हा गरम करताना नीट उकळावी. थंड झालेली भगर तशीच खाणे टाळावे. भगर खाल्ल्यानंतर मळमळ, उलटी, पोटात दुखणे, डोके दुखणे, थकवा, ताप, चक्कर येणे, श्वास घेण्यात अडचण अशा वेळी तत्काळ नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात दाखल व्हावे. उशीर करणे जीवघेणे ठरू शकते. भगर शिजवताना वैयक्तिक स्वच्छता राखावी. घरगुती भगर ऐवजी औद्योगिकरित्या उत्पादन केलेल्या भगरचे सुरक्षितपणे सेवन करावे. भगरवर कोणतेही रासायनिक प्रिझर्वे टिव्ह असल्यास ती खाणे टाळावी. आरोग्याशी कोणतीही तडजोड करू नये. योग्य ती काळजी घेतल्यास विषबाधा टाळणे शक्य होते. जिल्हा प्रशासनाने केलेल्या सूचना नागरिकांनी गांभीर्याने घेत खबरदारी घ्यावी, अशा सूचनाही स्वामी यांनी केल्यात.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार ०६ जुलै २०२५
https://lokaarambh.com



# कै. बायमा नामदेव शेठ पाटील यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना छत्री वाटप.



प्रतिनिधी विठ्ठल ममताबादे उरण दि ५ कै. बायमा नामदेव शेठ पाटील यांच्या स्मरणार्थ कामगार नेते तथा सामाजिक कार्यकर्ते मधुकर शेठ पाटील यांच्या तर्फे रा. जि. प. शाळा बेलपाडा येथील विद्यार्थ्यांना छत्री वाटपचा कार्यक्रम मोठया उत्साहात संपन्न झाला.छत्री मिळाल्याने सर्व विद्यार्थी आनंदीत होते.सामाजिक कार्यकर्ते तथा मधुकरशेठ पाटील हे सामाजिक बांधिलकी जपत वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात.त्यांनी आजपर्यंत अनेक गोर गरिबांना सढळ हाताने, निस्वार्थीपणाने मदत केली आहे.कै. बायमा नामदेव शेठ पाटील यांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना छत्री वाटप करून त्यांनी सर्वांचा आनंद द्विगुणित केला आहे.या कार्यक्रम प्रसंगी सुरेश पाटील (राष्ट्रीय महामंत्री भारतीय मजदूर संघ ), सुधीर घरत (राष्ट्रीय खजिनदार भारतीय मजदूर संघ ),अतिश पाटील (सचिव रायगड जिल्हा संयुक्त ट्रान्सपोर्ट संघटना ), तुकाराम ठाकूर (माजी सरपंच ),कर्णिक पाटील (सचिव ग्राम सुधारणा मंडळ बेलपाडा ), प्रकाश कडू (समाजसेवक ), अरुण घरत, अशोक घरत, संतोष भ. म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.


# सर्वधर्मीय सामूहिक विवाह मेळावा यवतमाळात उत्साहात पार पडणार

प्रतिनिधीयवतमाळ : पंचशिल बहुउद्देशीय शिक्षण संस्था, यवतमाळ यांच्या वतीने आज रविवार, दि. ६ जुलै २०२५ रोजी सर्वधर्मीय, अंध-अपंग, आदिवासी, बौद्ध व आंतरजातीय जोडप्यांसाठी सामूहिक विवाह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य मेळावा लॉर्ड बुद्धा टी.व्ही. चॅनेलच्या सभागृहात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मा. बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी मा. संतोषभाऊ ढवळे हे लाभणार आहेत. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक अतिथी म्हणून साहित्यिक व समाजिक नेते मा. बाबाराव मडावी आणि मा. सुभाषभाऊ कासार यांची उपस्थिती लाभणार आहे. या सामूहिक विवाह मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे गरजू, गरीब व सर्वसामान्य कुटुंबांना शासकीय योजनांचा लाभ देऊन लग्नसमारंभाच्या खर्चातून दिलासा मिळवून देणे हा आहे. विवाहानिमित्त कर्जबाजारी होणाऱ्या कुटुंबांची संख्या कमी व्हावी, यासाठी गेल्या पंधरा वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवण्यात येत असल्याचे संस्थेचे अध्यक्ष दादाराव पाझारे यांनी सांगितले. सर्वधर्मीय सौहार्द, सामाजिक समता आणि गरजूंना आधार देणारा हा विवाह मेळावा सामाजिक परिवर्तनाचा एक सकारात्मक टप्पा ठरत आहे.

# ‘भारत टॅलेंट सर्च’ परीक्षेत सानपवाडी शाळेचा लौकिक वाढवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव

प्रतिनिधी सानपवाडी (ता. पैठण) : जिल्हा परिषद शाळा सानपवाडी येथील विद्यार्थ्यांनी ‘भारत टॅलेंट सर्च’ या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत घवघविता यश मिळवत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. यानिमित्ताने मा. उपशिक्षणाधिकारी गीता तांदळे (जि.प. छत्रपती संभाजीनगर) मॅडम यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या परीक्षेत मल्हार तार्डे याने तालुक्यात प्रथम क्रमांक, तर जयदीप गायकवाड याने द्वितीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. याशिवाय राज गायकवाड (५ वा), प्रितेश गायकवाड (६ वा) आणि समाधान खेडेकर (७ वा) या विद्यार्थ्यांनीही केंद्रस्तरीय उत्तम कामगिरी केली. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शाळेतील शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांतून विद्यार्थ्यांच्या या यशाचे कौतुक करण्यात येत आहे.

# पवारचा खरा चेहरा बाहेर! जुनी तक्रार उकरली, गुन्हा दाखल होणारच! चाकणकरांचा हुंकार : मदत करणाऱ्यांचीही उकड काढणार!



बीड उमाकिरण शिक्षण संकुलातील अत्याचार प्रकरणाने गुरु–शिष्य नात्याची पवित्रता चिरडली, हे अत्यंत संतापजनक आहे. आरोपी विजय पवार आणि त्याचा साथीदार प्रशांत खाटोकर यांनी केलेल्या घृणास्पद कृत्याने पालकांना हादरवून टाकले आहे. या घटनेवर थेट आणि कडक भूमिका घेऊन रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट शब्दांत इशारा दिला ड्ढ ङ्क२०२३ मध्येच पवारविरोधात आलेली तक्रार जर शिक्षण खात्याने गांभीर्याने घेतली असती, तर आज ही लाजिरवाणी वेळ आली नसती. विजय पवार किती तक्रारी दबावत आला, हे सगळ्यांना ठाऊक आहे, पण आता त्याचा खेळ संपलाय. कायद्याचा दणका बसल्याशिवाय राहणार नाही.ङ्ख त्यांनी स्पष्ट केलं, ङ्कपवारला वाचवण्यासाठी ज्यांनी हातभार लावला, त्यांनाही सोडणार नाही. सगळ्यांची उकड काढणार, आणि कायद्याची चांगलीच झडती लावणार!ङ्ख पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, २०२३ मधील जुन्या तक्रारीवरही लवकरच गुन्हा दाखल होणार आहे. यामुळे विजय पवारची गळचेपी होणार, हे आता नक्की. प्रशासन, पोलीस आणि राजकीय प्रतिनिधी पीडितेला न्याय देण्यासाठी एकजूट झाले असून, या प्रकरणाचा प्रत्येक तपशील समोर आणला जाणार, असा विश्वास दिला गेला आहे.

# एक गावे आम्ही विठोबाचे नाम


वारी म्हणजे देहू, आळंदी व महाराष्ट्राच्या व देशाच्या कोणाकोपऱ्यात उगम पावणारी व पांडुरंगाच्या चरणापर्यंत वाहत जाणारी, चंद्रभागारुपी भक्तीसागरात विलीन होणारी लोकगंगा. आषाढीच्या निमित्ताने या लोकगंगेचे पंढरीत भक्ती सागरात रूपांतर होते. अठरा पगड जाती व सर्व धर्माच्या संत मेळाव्यातील लहान थोर असे वारकरी त्या ठिकाणी एकत्र येतात. जिथे जात नाही, धर्म नाही, भेद नाही, भीती नाही. भक्त हिच जात आणि भक्ती हाच धर्म अशी सगळ्यांची ओळख तयार होते. मुखी नाम, हाती टाळ, पाई वारी पंढरीची, पाऊले सदाचारी ही साधना करीत आलेली मंडळी याच धर्माचरणाने आपले जीवन जगत विठू नामाच्या गजरामध्ये दंग होतात, विठ्ठल भक्तीच्या रसामध्ये चिंब होतात. दरवर्षी हा अनुपम्य सोहळा अनुभवण्यासाठी डोळे, कान आणि मन अतुर झालेले असते. जगभरातून लोक या सोहळ्याची याची डोळा याची देही अनुभूती घेण्यासाठी येत असतात. आमुची मिरास पंढरी I आमुचे घर भिमा तीरी II पांडुरंग आमुचा पिता I रखुमाई आमची माता II भाव पुंडलिक मुनी I चंद्रभागा आमची बहिणी II ही भावना प्रत्येक वारकऱ्याच्या मनात असते. शेकडो वर्षांपासून ही भक्ती परंपरा अखंडितपणे चालत आलेली आहे. संत नामदेव महाराज म्हणतात आधी रचिली पंढरी । मग वैकुंठ नगरी ॥१॥ जेव्हा नव्हते चराचर । तेव्हा होते पंढरपुर ॥२॥ जेव्हा नव्हती गोदा गंगा । तेव्हा होती चंद्रभागा ॥३॥ चंद्रभागे तटीं ।धन्य पंढरी गोमटी ॥४॥ विठ्ठल भक्तांचा संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय आणि विठ्ठल भक्तांचा धर्म म्हणजे वारकरी धर्म जिथे सर्वांना समान संधी आणि समान दर्जा असतो. वारकरी धर्मातील साधू संतांचा ईश्वर हा परलौकिक मूल्यावर नव्हे तर माणुसकीवर आधारलेला होता. वारकरी संतांनी ज्याप्रमाणे तेहतीस कोटी देव विठ्ठलात आणले त्याचप्रमाणे इतर सर्व तीर्थक्षेत्र पंढरपुरात आणले. विठ्ठल हेच दैवत आणि पंढरपूर हेच तीर्थक्षेत्र मानले. देवप्राप्तीसाठी, पुण्यप्राप्तीसाठी, पाप मुक्तीसाठी तीर्थ, व्रत, एकादशी सोडता इतर उपवास, दान, महादान, नवस सायास, मंत्र, वैकुंठ, शुभ, अशुभ, विधी, निषेध, भोंदूगिरी यांचा कठोर शब्दात विरोध करून ते नाकारले. एकच देव आणि एकच तीर्थ का तर............. तिथे भेद नाही समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥१॥ विठ्ठलाच्या दरबारामध्ये कसलाही भेद नाही. जात, धर्म, वंश, पंथ, प्रांत, लिंग या कुठल्याही कारणाने भेद केला जात नाही. सर्वांकडे पाहण्याची समान दृष्टी असलेले दैवत म्हणून विठ्ठलाला वारकरी मानतात. आजही धार्मिक बाबतीत, प्रार्थनास्थळात विषमता दिसते. सर्वांना समान वागणूक दिली जात नाही. जात, धर्म, पंथ, वंश, लिंग या आधारे भेद केला जातो. आजही या कारणांनी संघर्ष उभे राहताना दिसतात. परंतु वारकरी संतांनी विठ्ठलाला डोळ्यासमोर ठेवून शेकडो वर्षांपासून समतेची पताका आपल्या खांद्यावरून वाहिलेली आहे हे आपल्याला दिसून येतं. यारे यारे लहान थोर I याती भलती नारी नर II किंवा अवघी एकाचीच वीण । तेथें कैचें भिन्नाभिन्न । किंवा विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।भेदाभेदभ्रम अमंगळ॥ संपूर्ण विश्वाला समतेच्या सूत्रात बांधण्याचे काम वारकरी संतांनी केलं. किंवा यातायाती धर्म नाही विष्णुदासा” या वाक्याचा अर्थ आहे की, विठ्ठलाचे भक्त कोणत्याही जाती-धर्मात विभागलेले नाहीत. ते सर्व एक आहेत. मुंगी आणि राव । आम्हा सारखाचि जीव ।। या सर्व संतवचनांमधून असे लक्षात येते की वारकरी संतांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी वारकरी धर्माची स्थापना केली. भीती नाही आजही आपण पाहतो की देवाधर्माच्या आडून भीतीचा व्यापार केला जातो. देवाची, धर्माची भीती दाखवून लोकांना लुबाडलं जातं, शोषण केलं जातं. याला छेद देण्याचं काम वारकरी संतांनी केलं. वारकरी संतांनी धर्माच्या देवाच्या व संस्कृतीच्या आडून होणाऱ्या अन्याय अत्याचार व शोषणाच्या विरोधात लढा उभा केला. वारकरी संतांनी विठ्ठलाला विठू माऊली म्हटलं. माऊली म्हणजे आई. देव ही भक्ताची आई असते आणि आई ही मुलांसाठी सर्वात जवळची आणि प्रिय असते. आईची भीती वाटत नाही त्यामुळे विठ्ठलाचे भक्त निर्भयपणे आणि थेट आपल्या देवासी संवाद साधतात. त्याच्याकडे आपलं गाऱ्हाणं मांडतात. आपल्या दुःखातून आपल्या संकटातून तो आपल्याला बाहेर काढेल असा विश्वास भक्तांना वाटतो त्यामुळे सर्व भार त्याच्यावर टाकून निश्चिंत होतात. कोणाच्या अंगात येत नाही पंढरीचा पांडुरंग विठ्ठल कोणाच्या अंगात येत नाही. असल्या खुळचट कल्पना, अंधश्रद्धा, कर्मकांड वारकरी संतांनी नाकारले एवढेच नाही तर ते देवही नाकारले. देव नाही भेटला तरी चालेल पण थोतांड नको ही परमार्थ सुरू करण्याची पहिली पायरी वारकरी संतांनी सांगितली. सेंदरीं हेंदरीं दैवतें । कोण तीं पुजी भुतेंकेतें । आपुल्या पोटा जीं रडतें । मागती शितें अवदान ॥१॥ शेंदूर फासलेली ओबड धोबड दैवते, भुते, खेते यांची कोण पूजा करतो? कारण तेच आपल्या पोटासाठी रडत असतात. आपल्या जिभेचे चोचले पुरवण्यासाठी जे इतरांना त्रास देतात, आपल्या भक्तांकडून मुक्या जिवांवर शस्त्राचा घाव मारून रक्ताचा अभिषेक करून घेतात ते देव आपल्या भक्ताला काय बरे देणार ? अशा देवाला जो देव मानतो, तो अज्ञानी, आणि खोटेपणाने वागणारा आहे. असे तुकाराम महाराज म्हणतात. मानवतेच्या कल्याणासाठी, न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता, या मूल्यांना जनमानसात रुजवण्यासाठी वारकरी संतांनी दैवतही समचरण दृष्टी असलेलेच निवडले ते म्हणजे विठ्ठल आणि फक्त विठ्ठलाची भक्ती करायला सांगितले. एक गावें आम्ही विठोबाचे नाम। आणिकांपें काम नाहीं आतां ॥१॥ किंवा एक धरिला चित्तीं । आम्ही रखुमाईचा पती ॥ संत शिरोमणी नामदेव महाराज यापुढे जाऊन विठ्ठलालाच सर्वस्व मानतात ते म्हणतात..... आमुचा विठ्ठल प्रचंड । इतर देवाचे न पाहू तोंड ।।१।। एका विठ्ठलावाचून । न करू आणिक भजन ।।२।। आम्हा एकविध भाव । कदा न म्हणू इतरा देव ।।३।। नित्य करू अभ्यास । म्हणे नामा विष्णूदास ।। ४।। आमुचा विठ्ठल प्रचंड आहे, महान आहे, मोठा आहे त्यामुळे आम्ही फक्त विठ्ठलाचीच भक्ती करू, विठ्ठलालाच सर्वस्व मानु, विठ्ठलाचीच पूजा करू आणि विठ्ठलाचेच भजन करू, इतर देवाकडे आम्ही बघणारही नाही असे संत नामदेव महाराज म्हणतात. वारकरी संतांनी जाणीवपूर्वक गोरगरीबांना, शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना सहज आणि सोप्या पद्धतीने भक्ती करता येईल असं दैवत दाखवून दिलं. आपण दुकानात गेलो तर आपल्या मापाच्या वस्तू घेतो. आपल्या आवाक्यातल्या वस्तू घेतो. तसा देवही आपल्या मापातला, आपल्या आवाक्यातला असावा. आपल्याला झेपेल असा असावा. आपली दमकोंडी होणार नाही, आपली फरपट होणार नाही असा देव भक्ती करण्यासाठी निवडला पाहिजे आणि अगदी तसाच देव वारकरी संतांनी वारकऱ्यांना दाखवून दिला. भक्ती मार्ग आम्हाला सोपा करून दिला. सोपें वर्म आम्हां सांगितलें संतीं । देवप्राप्तीचे, भक्तीचे, पुण्यप्राप्तीचे, पापमुक्तीचे अवघड मार्ग वारकरी संतांनी नाकारले माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात....... योग याग विधी येणें नव्हे सिध्दि । वायाचि उपाधि दंभ धर्म ॥१॥ हे सगळे मार्ग नाकारतानाच माऊलींनी पुण्य प्राप्तीचा सोपा मार्ग सांगितला.... हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा I पुण्याची गणना कोण करी I तुम्ही मुखाने ‘हरि हरी म्हणा! तुम्ही मुखाने हरीचे म्हणजे विठ्ठलाचे नामस्मरण करा! तुमचे पुण्य अगणित वाढेल असे माऊली म्हणतात. माऊलींनी संपूर्ण हरिपाठात नामस्मरणाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. माऊलींचा हरिपाठ म्हणजे विठ्ठल भक्तीचा सहजसोपा राजमार्ग आहे. वारकरी संतांनी अवघड मार्ग नाकारले आणि भक्तांना भक्ती करण्यासाठी पर्यायी सोपे मार्ग दाखवून दिले. मोडूनियां वाटा सूक्ष्म दुस्तर ॥ केला राज्यभार चाले ऐसा ॥ संत तुकाराम महाराज म्हणतात कर्माच्या सूक्ष्म वाटा आणि योगाच्या दुस्तर वाटा मोडून राजाचे चतुरंग सैन्य जेवढे बलाढ्य असते तेवढा मोठा मार्ग आम्ही प्रस्तापित केला आहे. आता आम्ही मृदंग ,विना, स्वरात लावू व टाळाचा घोष करून ब्रम्ह रस आवडीने सेवन करू. याही पुढे जाऊन आणखी सोपा मार्ग सांगताना संत तुकाराम महाराज म्हणतात...... नामसंकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ।। न लगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ।। ठायींच बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ।। रामकृष्णहरी विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ।। याविण आणिक असता साधन । वाहातसे आण विठोबाची ।। तुका म्हणे सोपे आहे सर्वांहूनि । शाहाणा तो धणी घेतो येथे ।। संत तुकाराम महाराज म्हणतात की देवाला प्राप्त करून घेण्यासाठी नामसंकीर्तन हे साधन अतिशय साधे आणि अत्यंत सोपे आहे. त्याने माणसाची अनेक जन्माची पापे जळून खाक होतात. पुढे ते म्हणतात परमार्थ करण्यासाठी किंवा साधण्यासाठी इथे कोणालाही कसलेच कष्ट उपसायची गरज लागत नाही की घरदार सोडून वनात जाण्याची गरज पडत नाही. तर वाचेने फक्त नाम घेतल्याने नारायण स्वतःहून आणि सुखाने आपल्या घरी चालत येतो. नाम घेण्यासाठी फक्त एकच गोष्ट करावी लागते ती म्हणजे शांत चित्ताने एकेठिकाणी बसून आवडीने त्या अनंताला आळवावे, त्याच्या नामाचा जयघोष करावा आणि ‘रामकृष्णहरी विठ्ठल केशवा’ हा मंत्र सदासर्वकाळ जपावा. संत तुकाराम महाराज पुढे म्हणतात की देवप्राप्तीसाठी, भक्तीसाठी नामस्मरणाशिवाय आणखी दुसरे कोणतेच प्रभावी साधन नाही आणि हे मी विठोबाची आण म्हणजेच शपथ घेऊन सांगतो. तुकोबाराय शेवटी म्हणतात की परमार्थ मार्गातील इतर सांधनांमध्ये ‘नाम घेणे’ हे सर्वात सोपे आणि सुलभ साधन आहे. परंतु जो येथे शहाणा आहे तोच भाग्यवंत या मार्गाचा अवलंब करतो आणि मन भरेपर्यंत त्याचा आस्वाद घेतो. एवढा साधा सोपा आणि सरळ भक्ती मार्ग वारकरी संतांनी सांगितला त्यामुळे त्याच मार्गाने पुढे जाण्यात आपले हित आहे. संत निळोबाराय म्हणतात.... मार्ग दाऊनी गेले आधी | दयानिधी संत ते || तेणेचिं पंथे चालो जाता | न पडे गुंता कोठे काही || वारकरी संतांनी दाखवलेल्या मार्गावरून वाटचाल केली तर आपला जीवनमार्ग सोपा होईल यात काही शंका नाही. आषाढी एकादशी निमित्ताने सर्व भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा.



**ह भ प संतोष महाराज डोंगरे
जिल्हाध्यक्ष संत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष बीड मो. ९४२१३३५९४६**

# चकलांबा परिसरात पंधरा दिवसापासून पावसाची दांडी शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट

चकलांबा प्रतिनिधी:( ) जून महिन्याच्या अगोदरच व मृग नक्षत्राच्या सुरुवातीलाच पावसाने आगमन करून सर्वांनाच सुखद धक्का देणाऱ्या पावसाने पंधरा दिवसापासून चांगलीच दांडी मारली यावर्षी वर्तवण्यात आलेल्या अंदाजानं काहीशी बगल देत पाऊस लांबल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे.येत्या पाच-सहा दिवसात पावसाने हजेरी लावली नाही तर ज्या शेतकऱ्यांनी मोठ्या धाडसीने खरिपाची पेरणी केली त्या पावसाअभावी पिके आता हातातून जाण्याची भीती शेतकरी करीत आहे.चातक पक्षीप्रमाणे आभाळाकडे डोळे लावून मिटून शांतपणे पावसाची प्रतीक्षा शेतकरी राजा करू लागल्याचे चित्र चकलांबा आणि चकलांबा परिसरात होत आहे .सुरुवातीलाच आगमन करून सर्वांनाच सुखद धक्का देणाऱ्या या पावसाने मागील पंधरा ते वीस दिवसापासून चांगलीच दांडी मारली त्यामुळे चकलांबा परिसरातील शेतकरी हवालदिल झाला आहे. पिके जमिनीतील आकाराहून पाण्याअभावी करपून जाण्याच्या मार्गावर आहेत तर काही भागात मशागिती सर्व कामे पूर्ण झाली असली तरी पावसाअभावी बहुतेक ठिकाणी पेरण्या रखडल्या आहेत. पिके कोमोजून जात असल्याने पिकांना वाचण्यासाठी शेतकरी हा तुषार सिंचनाच्या सहाय्याने पिकांना पाणी देत असल्याचे चित्र दिसून येत आहे.यंदा



संपूर्ण महिन्यापासून पाऊस नाही.शेतकऱ्यांनी कोणती ना कोणती उसनावारी करून शेतकऱ्यांनी बी- बियाणे ,खत खरेदी केलेले आहे. दमदार पाऊस पडला त्यामुळे चांगल्या पावसाच्या भरवशाने चांगले पीक येतील या आशेवर लोकांकडून उसनेवारी पैसे घेऊन बी बियाणे खते खरेदी केली पावसाने पंधरा ते वीस दिवसापासून दांडी मारल्याने पिके नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. शेतकऱ्यासमोर दुबार पेरणीचे वेळ येण्याच्या मार्गावर आहे. दुबार पेरणीची वेळ आली तर पैसा आणावा तरी कुठून ही चिंता सातत्य शेतकरी करीत आहे . रोजच ढगाळ वातावरण तयार होत आहे. पाऊस आज येईल उद्या येईल असे करता करता पंधरा दिवस उलटले तरीपण पाऊस पडायचे काही नाव घेईना.पावसाची प्रतीक्षा शेतकरी राजा करू लागल्याचे चित्र या चकलांबा, चोरपुरी, हिवरवाडी,महांदुळा रसुलाबाद,अर्ध पिंपरी या परिसरातील भागात पाहावयास मिळत आहे.

(पाच एकरात कापसाची लागवड केली आहे पिके उगवली कापूस सध्या तीन ते चार पानवर आहे परिणामी पावसाने मारलेली दांडी तसेच जमिनीतील उष्णता वाढ अशा बिकट परिस्थितीमुळे पिके धोक्यात आली आहे दमदार पाऊस पडेल व पीक जगेन हीच अपेक्षा)
**शरद खेडकर ,शेतकरी चकलांबा.**

# कपडे काढा मला टोटका करायचाय; पत्नी आणि सासूला केलं निर्वस्त्र मुंबईत काळ्या जादूचा आघोरी खेळ

अंधश्रद्धा माणसाला काहीही करायला लावू शकते, असाच एक धक्कादायक प्रकार मुंबईमधून समोर आला आहे. या व्यक्तीनं अंधश्रद्धेपोटी सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, नवी मुंबईमध्ये घडलेल्या या प्रकारामुळे खळबळ उडाली आहे. काळ्या जादूसाठी एका तरुणानं आपली सासू आणि पत्नीसोबत जे केलं त्या प्रकारानं पोलीसही हादरले आहेत. जाणून घेऊयात नेमकं काय आहे प्रकरण? रमेश असं या व्यक्तीचं नाव आहे, तो मुळचा उत्तर प्रदेश येथील देवरियाचा रहिवासी आहे. तो आपली पत्नी आणि सासूसोबत नवी मुंबईमध्ये घर भाड्यानं घेऊन राहातो. रमेशचा स्वभाव पहिल्यापासूनच थोडा विचित्र होता. मात्र एप्रिल महिन्यात तो असं काही बोलला ज्यामुळे त्याची पत्नी राधा आणि सासू सरिता यांना प्रचंड धक्का बसला. राधाच्या छोट्या भावाचं लग्न जमत नव्हतं, त्याचं लग्न लवकर होण्यासाठी आपल्याला एक खास उपाय करावा लागेल असं त्याने आपली पत्नी आणि सासूला सांगितलं.जर राधाच्या भावाचं



म्हणजे त्याच्या मेव्हण्याचं लग्न लवकर जमवायचं असेल तर तुम्हाला तुमचे कपडे काढावे लागतील असं त्याने आपल्या सासूला आणि पत्नी सांगितलं. रमेश एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने आपल्या पत्नीला आणि सासूला निर्वस्त्र केलं, हा मी करत असलेल्या टोटक्याचाच भाग असल्याचं त्याने आपल्या सासूला आणि पत्नीला सांगितलं. भीतीमुळे रमेशची सासू आणि त्याची पत्नी या गोष्टीला तयार झाल्या, कारण त्यांनाही वाटत होतं आपल्या मुलाचं लवकर लग्न व्हावं, मात्र रमेशच्या मनात वेगळंच काहीतरी होतं, त्याने या दोघींचे अश्लील फोटो काढले. त्यानंतर त्याने आपली पत्नी आणि सासू यांना ब्लॅकमेलिंग करायला सुरुवात केली. त्याने आपल्या पत्नीला सांगितलं की तू जर माझं ऐकलं नाही तर मी हे फोटो सोशल मीडियावर पोस्ट करेल. त्यानंतर रमेशने आपल्या बायकोला अजमेरला बोलावं, त्याची पत्नी अजमेरला आली देखील, मात्र तरीही त्याने तिचे फोटो तिच्या वडिलांना आणी भावाला पाठवले. ही गोष्ट राधाला कळताच अखेर तिने आपल्या पतीविरोधात गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल होताच आरोपी फरार झाला आहे, घटनेबाबत तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## बीड नगर परिषदेतील वसुली विभागात ये-जा करणाऱ्या वृद्धांच्या जीवितास धोका! वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावरून खालच्या मजल्यावर हलविण्याची मागणी

बीड (प्रतिनिधी) - बीड नगर परिषदेतील वसुली विभागात ये-जा करणाऱ्या वृद्धांच्या जीवितास धोका असल्याचे नमूद करून वसुली विभाग इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून खालच्या मजल्यावर हलविण्याची मागणी रमेशराव गंगाधरे आणि एस.एम.युसूफ़ यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड नगर परिषदेच्या टोलेजंग इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावर वसुली विभाग आहे. शहरात राहणाऱ्या नागरिकांना या विभागात घरपट्टी, नळपट्टी आणि तत्सम कर भरण्यासाठी जावे लागते. कर भरण्याचे काम बहुतेक करून घरात राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांकडे असते. कर भरण्याकरिता बीड नगर परिषदेत येणारे ज्येष्ठ नागरिक हे साधारण ६०-६५ वर्षांच्या पुढे वय असलेले असतात. या वयात बहुतांश नागरिकांचे हाडे ठिसूळ झाल्याने गुडघे दुखतात. शिवाय हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह असलेल्या नागरिकांना तर इमारतीच्या पायऱ्यांवर चालत ये-जा करण्याऐवजी बसून पायऱ्या चढ-उतार करावी लागत असल्याचे दिसत आहे. एकंदरीत वसुली विभाग तिसऱ्या मजल्यावर असल्याने ज्येष्ठ नागरिकांना कर भरण्यासाठी गेल्यानंतर दमादम व्हावे लागत आहे. त्यांना मोठ्या प्रमाणात धापा लागत आहेत. एखाद्या वेळेस श्वासोच्छ्वास कमी अधिक प्रमाणात झाल्यास येथे एखाद्या वृद्धाचा जीव जाण्याचा धोकाही संभवतो. म्हणून बीड नगर परिषदेतील




तिसऱ्या मजल्यावरील वसुली विभाग पहिल्या मजल्यावर नगरसेवकांसाठी असलेल्या हॉल मध्ये हलविण्यात यावे. नगरसेवकांसाठी ठेवण्यात आलेल्या ऐसपैस हॉलचा वापर वर्षातून कधीतरी होतो आणि तिथे मोजकेच नगरसेवक कधीतरी येतात मात्र वसुली विभागात बीड शहरातील हजारो नागरिक दररोज ये-जा करतात. हे लक्षात घेऊन तिसऱ्या मजल्यावरून वसुली विभागाला खाली नगरसेवकांसाठी ठेवण्यात आलेल्या मोठ्या प्रशस्त हॉलमध्ये हलविण्यात यावे. अशी मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



बीड (प्रतिनिधी) शासकीय रुग्णालय बीड येथे कार्यरत असलेल्या सौ.जयश्री सुनील थिटे यांनी आपला वाढदिवस जिव्हाळा निवारा बेघर केंद्रातील बेघर असलेल्या लाभार्थ्यांच्या समवेत त्यांना गोड जेवण देऊन साजरा केला. त्या आपला वाढदिवस नियमितपणे जिव्हाळा बेघर निवारा केंद्रात साजरा करून समाजापुढे एक आदर्श निर्माण करत आहेत. अनाथ बेघर ज्यांना कोणीही नाही अशा सर्वांना अन्नदान करून सौ जयश्री थिटे या आपला वाढदिवस साजरा करत असतात.प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी त्यांनी आपला वाढदिवस जिव्हाळा बेघर निवारा केंद्रातच साजरा केला. यावेळी जिव्हाळा परिवाराचे श्री अभिजीत वैद्य सर, राजु वंजारे सर, छाया सरोदे उपस्थित होते. जिव्हाळा निवारा केंद्रातील सर्व बेघर लाभार्थ्यांनी थिटे मॅडम यांना वाढदिवसाच्या मनस्वी शुभेच्छा देत त्यांच्या या उपक्रमाबद्दल कौतुक करून त्यांना अनंत आशीर्वाद दिले.




बीड - मौजे उंदरी येथे आषाढी एकादशी निमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंदरी व समस्त गावकरी मंडळ व ग्रामपंचायत कार्यालय उंदरी सरपंच सुदाम दादा ठोंबरे व समस्त गावकरी यांच्या वतीने वारकरी दिंडी गावामध्ये काढण्यात आली.

## बीड मौलाना आझाद महामंडळात कर्मचाऱ्यांनी लाखोंचा भ्रष्टाचार करून मालामाल झाले: प्रा सापनकर

बीड । प्रतिनिधी मौलाना आझाद अल्पसंख्याक व आर्थिक विकास महामंडळात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे गंभीर प्रकार समोर आला आहे शासनाने अल्पसंख्यांक व आर्थिक दुबळ घटकासाठी कर्ज पुरवठा योजना स्थापन केलीआहे या महामंडळातील काही कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी आपल्या घरातील नातेवाईक व मित्र कंपनींना कर्ज दिले आहे शासकीय कर्मचारी कागदपत्रे प्रक्रियेचा आधार न घेता अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे या योजनेचा लाभ घेताला आहे गोरगरीब गरजूंना डावलून भ्रष्टाचार स्वतःचा खिशा भरण्यासाठी या कर्मचाऱ्यांने नातेवाईकांना सर्रास कर्ज मंजूर करून दिले आहे गोरगरिबांच्या हक्का वर गदा आणला आहे मौलाना आझाद म हामंडळ ात अनेक अल्पसंख्यांक गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना कर्ज दिले जात नाही गोरगरिबांना कर्जघेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कागदपत्राची मागणी केली जाते व खऱ्या गरजूंना डावलून कोट्याधीश रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे हा प्रकार राज्याचे अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे साहेब यांच्याकडे भ्रष्टाचारी अधिकारी यांची चौकशी झाली पाहिजे उर्वरित व बीड जिल्ह्यातील मौलाना आझाद महामंडळातील कर्जवाटप झाले आहे मात्र संबंधित राहिली दस्तऐवज आणि रेकॉर्ड गायब केले आहे कर्ज वाटप करणारी अधिकारी ने आपल्या नातेवाईकांना प्राधान्य दिले आहे खऱ्या गरजूंना कर्ज दिले जात नाही मौलाना आझाद महामंडळाच्या घोटाळ्याची चौकशी झाली पाहिजे नसता जिल्हाधिकारी साहेबांना भेटून निवेदन देण्यात आले आहे लवकरच या प्रकरणाची चौकशी योग्य रित्या करू असं आश्वासन दिले आहे नसता आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड अध्यक्ष प्रा, सापनकर यांनी दिला आहे.





# माजलगाव न.प. हद्दीतील मालकी व शासकीय जमीन शासनाने ताब्यात घेऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करावे

## समाजवादी पक्षाचे तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांचे १५ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषण करणार

## बोगस गुंठेवारी पी. टी. आर. व बनावट नाहरकत आधारे न. प. मालमत्ता रजिस्टर ला केली जाते नोंद

माजलगाव /प्रतिनिधी नगरपरिषदेच्या मालकीची सर्वे ०५ ०६, ०७,०८ व शहरातली इतर सर्वे नंबर मधील शासकीय राखीव व ओपन स्पेस आणि नदीपात्रावरची राखीव रेड झोन व इतर शासकीय जमीन जिल्हाधिकारी साहेब यांनी जुने सात बारा, फेरफार व नकाशा नुसार तात्काळ न. प. हद्दीतील व इतर शासकीय जमीन शासनाचे ताब्यात घेण्यात येऊन संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत करिता आपले कार्यालय समोर १५/०७/२०२५ रोजी अमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन समाजवादी पक्षाचे तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन सिद्दिकी यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहे. माजलगाव शहरातील नगरपरिषदेचे ओपन स्पेस, घरकुल, इतर राखीव व रेड झोन तसेच शासकीय इतर कोणतीही जमीन माजलगाव चे मुख्य अधिकारी व लिपिक तसेच इतर कर्मचारी यांनी भूमाफियांशी संगमत करत शासकीय जागेची बोगस गुंठेवारी करून बोगस खरेदी विक्री खत तयार करून नामांतरण करत अनेक एकर जमीन नगर नगरपरिषद मालकीची न.प. हदतील व इतर शासकीय जमीनी बेकायदेशीरपणे शासनाची दिशाभूल करून अवैध संचिका गैररित्या बोगस दस्तावेज तयार करून जमीन प्लॉटिंग करून विकून टाकली आहे. शासकीय संपत्तीची विल्हेवाट लावली आहे. तरी जिल्हाधिकारी साहेब यांनी माजलगाव नगरपरिषद हद्दीतील जमीन व शहरातली सर्व सरकारी राखीव जमीन तसेच ओपन स्पेस जमिन संबंधितांनी






विकली आहे. तरी जिल्हाधिकारी साहेबांनी नगरपरिषदेच्या हद्दीतील इतर शासकीय जमीनीची मोजणी करून तात्काळ शासनाने ताब्यात घेऊन नगरपरिषद नकाशा, महसूल नकाशा प्रमाणे जुन्या सातबारा व नगर रचनाकार बीड नकाशा प्रमाणे ही सर्व विविध जमीनीचे सर्व बेकायदेशी बनावट गुंठेवारी पी.टी. आर. नामांतरण सातबारा फेरफार रद्द करून तात्काळ शासनाच्या ताब्यात घेण्यात यावे. व या प्रकरणांमध्ये नगरपरिषद मुख्याधिकारी, कर्मचारी व सर्व संबंधितांवर कायदेशीर सर्वांची बीड जिल्हा स्तरावर चौकशी करून व ज्या भुमाफीया यांनी शासकीय,राखीव,ओपन स्पेस जमीन बेकायदेशीर नवा, जुना फेरफार करून गुंठेवारी खरेदी विक्री खत तयार करत नामांतरण करून बेकायदेशीर विक्री केली आहे अशा भुमाफीया वर व संबंधित आधिकारी,पदाधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे. नसता लोकशाही मार्गने माजलगाव समाजवादी पक्षाच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालया समोर दि. १५ /०७/२०२५ रोजी अमरण उपोषण आंदोलन करण्यात येईल. यात काही अनुचित प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असे निवेदननवीदोद्दिन सिद्दिकी समाजवादी पार्टी तथा- महाराष्ट्र बांधकामगार मजदूर संघटना- तालुका माजलगाव- यांनी जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दिले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com